**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र, आवसु-२००६/प्र.क्र.७२/का.१४, दि.२६ जुन, २००७.
२) मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.जिनिस/का-५(१)/आउयो/१६-१७/प्र.क्र.७५/५१८, दि.२०/०३/२०१७.
३) या कार्यालयाचे तांत्रिक मान्यता आदेश क्र. जिपना/ग्रापापुवि/तां.मं./रेशा-१२/९८१/२०१७, दि.२७/०६/२०१७.
४) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपी-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-०९, दि.०७ ऑक्टोंबर, २०१७.

---

## कार्यारंभ आदेश

जा.क्र.जिपना/ग्रापापुवि/निविदा/ ४८२ /२०१८
दिनांक : 22 FEB 2018
61/63

प्रति,
**मे.माऊली कन्स्ट्रक्शन,**
टेंभे (खालचे),
ता.सटाणा, जि.नाशिक.

खालील दर्शविलेले कामाची निविदा आपल्या नावे, **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा **(-०.५०%)** कमी दराने खालील नमुद अटि व शर्ती नुसार मजुर करण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाबाबत आपण सदरचे काम करण्याबाबत करारनामा करुन दिलेला आहे.

त्यानुसार खालील दर्शविलेले काम, मंजुर ब-१ ई-निविदेप्रमाणे सुरु करावे. उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मालेगाव यांना सदर कामाची देखरेख करण्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. काम सुरु करण्याची तारिख या आदेशाच्या दिनांकापासून असुन, करारनाम्याप्रमाणे सदरचे काम पुर्ण करण्याची अंतिम मुदत दि.३१/०३/२०१८ पर्यंत आहे. सोबत ब-१ ई-निविदेची प्रत जोडुन पाठवित आहे.

सदरचे काम सुरु असतांना, कामावर हजर राहणा-या जबाबदार व्यक्तीचे नाव या कार्यालयास कळविण्यात यावे. या कामाबाबतचा सर्व पत्रव्यवहार, उपविभागामार्फतच करण्यात यावा. करारनाम्याप्रमाणे शासकीय संचालनाकडे कामागारांचा व कामाचा विमा उतरविणे अनिवार्य आहे. सदर कामाचा सदोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्यानंतर १२ महिने राहील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची किंमत रुपये | कामाचा दर | स्वीकृत निविदेची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | **ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम अंतर्गत, तांदुळवाडी, ता.बागलाण पिण्याच्या पाण्याची विहीर बांधणे** | ७,२३,०७७/- | (-) ०.५०% कमी दराने | ७,१९,४६२/- | दि.३१ मार्च, २०१८ पर्यत |

**लेखाशिर्ष** : **जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी**

**प्रशासकीय मंजुरी** : मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.जिनिस/का-५(१)/आउयो/१६-१७/प्र.क्र.७५/५१८, दि.२०/०३/२०१७.

Scanned by CamScanner

**अटी व शर्ती :**

१. योजनेच्या उद्‌भवास पुरेसे पिण्यायोग्य पाणी उपलब्ध असल्याची खात्री करुनच योजनेची पुढील कामे हाती घेण्यात यावीत.

२. सदर कामासाठीची जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबत खात्री करावी. तसेच सदरची जागा खाजगी मालकीची असल्यास, त्याबाबत ग्रामपंचायतीच्या नावे दानपत्र केल्याबाबत करारनामा केलेला असल्याची खात्री करुन, सदर जागा ग्रामपंचायतीच्या नावावर करुन काम हाती घेण्यात यावे.

३. विहीत मुदतीत कामे पुर्ण न केल्यास, जिल्हा परिषद प्रतिदिनी जो दंड आकारेल, तो आपणास बंधनकारक राहील.

४. सदर कामासाठी आवश्यक असलेलया सर्व विभागाची परवानगी घेतल्याबाबतची खात्री करावी.

५. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, सदरहू काम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी योजनेतुन घेण्यात आल्याचा नामफलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे दिसेल असा लावण्यात यावा.

६. सदर कामासाठी कोणल्याही प्रकारचा अतिरिक्त मोबदला (उदा. भाववाढ इत्यादी) तसेच कोणताही अग्रीम (Advance) जिल्हा परिषदेमार्फत अदा केला जाणार नाही.

७. सदर कामाचे लेखापरिक्षण झाल्यावर, लेखापरिक्षणास काही शक अगर वसुली निघाल्यास, त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी आपली राहील.

८. संदर्भ क्र.२ व ३ मधील प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यतेच्या आदेशात नमुद अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

९. GST बाबत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश, शासन पत्रे लागु राहतील.

१०. तसेच योजनेच्या कामाबाबत शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश, शासन पत्रे लागु राहतील.

११. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर, ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

**कार्यकारी अभियंता**
ग्रा.पा.पु.विभाग जि.प.नाशिक

**प्रत :** उप विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन २६४ पहिला मजला कला नगर समोर वांद्रे, पुर्व मुंबई ४०००५१ यांना माहितीसाठी रवाना.

**प्रत :** गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बागलाण यांना माहीतीस्तव रवाना.

**प्रत :** उप अभियंता, ग्रा.पा.पु. उप विभाग, मालेगांव यांना माहीतीस्तव रवाना.
**सोबत :** ब-१ निविदेची प्रत जोडुन पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned by CamScanner